**तात्काल**

# मुंबई विद्यापीठ
## विद्यार्थी कल्याण विभाग
क्र.वि.क.वि./३८३/२०१४

डॉ. मृदुल निळे
संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई ४०० ०२०.

**परिपत्रकः**

विषयः गांधी जयंती निमीत्त भजनसंध्याचे आयोजन करणे बाबत.

महोदय/महोदया,

विश्व अहिंसा दिन, महात्मा गांधी जयंती व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती यांचे औचित्य साधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये अहिंसा आणि विश्वबंधुत्वाचा संदेश देण्यासाठी तसेच मुल्याधिष्टित जीवनप्रणालीचे महत्व पटवून देण्यासाठी मुंबई विद्यापीठ गुरूवार, दिनांक २ ऑक्टोबर, २०१४ रोजी सायंकाळी ४ वाजता गेट वे ऑफ इंडियावर भव्य भजनसंध्याचे आयोजन करीत आहे.

या भजनसंध्येमध्ये वैष्णव जन तो, रघुपती राघव राजाराम, सत्यम शिवम सुंदरम, अल्ला तेरो नाम आदि भजने प्रसिध्द गायक सादर करणार आहेत. या सर्व कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुंबई विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. नरेशचंद्र हे असून कुलसचिव डॉ. खान व बी.सी.यु.डी. चे संचालक डॉ. राजपाल हांडे यांच्या संयोजनाखाली विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, संगीत विभाग, लोककला अकादमी व आजीवन अध्ययन व विस्तार विभाग, थिएटर अकॅडमी आदि विभाग सहभागी होत आहेत. या कार्यक्रमास विविध महाविद्यालयातून राष्ट्रीय सेवा योजनचे ३००० विद्यार्थी सहभागी होत आहेत.

या कार्यक्रमास आपण आपल्या सर्व विद्यार्थ्यासमवेत उपस्थित रहावे ही विनंती.

मुंबई ः ४०० ०२०.
दिनांक ः २३ सप्टेंबर २०१४.

[डॉ. मृदुल निळे]
प्र.संचालक वि.क.वि.

प्रत ः विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक / विभाग प्रमुख, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल, वित्त व लेखा अधिकारी, कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख आणि सचिव, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ यांच्या माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर.